## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र.२५८/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ११/०४/२०१७

१) लाकडी काठीने मारुन मुलांचा मृत्यु . :—

दिनांक ०७/०४/२०१७ चे १५.०० वा. दरम्यान यातील मृतक चंकीत शिवदास राऊत वय १० वर्ष ,रा. टेंभणी यांचे सोबत असलेले मित्र प्रत्यक्षदर्शी साक्षदार हे आरोपीचे शेतात आंबे तोडण्यास गेले असता मृतक व त्याचे मित्रांनी झाडावरील आंबे तोडल्याने आरोपी हा शेतात आल्याने मृतक व त्याचे मित्र आरोपीचे भितीने पळुन गेले आरोपीने त्यांचा नहरा पर्यत पाठलाग केल्याने मृतकांचे मित्रांनी चांदपुर ते चुन्हाड नहराचे पाण्यात उडी घेवुन नहरातुन पोहत दुसरा काठावर गेले मृतक यास पोहता येत नसल्याने नहरातील गवताला पकडुन बसला असता मृतक यास आरोपीने लाकडी काठीने मारल्याने त्याचा हात सुटल्याने मृतक हा पाण्यात बुडुन मरण पावल्याने मर्ग क्र. ०३/१७ कलम १७४ जाफौ. चे चौकशीत निष्पन्न झाल्याने सरतर्फे फिर्यादी कदम पो.स्टे सिहोरा यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम ३०२ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. जाईले पोलीस स्टेशन सिहोरा हे करीत आहे. आरोपी अटक आहे.

२) शेतातील मोटार पंपची चोरी . :—

दिनांक ०९+१०/०४/२०१७ चे रात्र. दरम्यान यातील फिर्यादीचे शेतशिवारात धानाचे पीकासाठी फिल्टरला लावलेली १.५ हार्सपावरची मोटार पंप नं. १३२१४ जे यु. २९७ किंमती ४,४००/—रु. कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन चोरुन नेल्याने फिर्यादी भाष्कर झिंगर मेश्राम वय ५९ वर्ष, रा. मन्हेंगाव( नवीन) यांचे तोंडी रिपोर्ट वरून आल्याने पोलीस स्टेशन पालांदुर कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. शेंन्डे पोलीस स्टेशन पालांदुर हे करीत आहे.

३) ट्रक चालकांच्या निष्काळजीपणामुळे उभ्या असलेल्या कारला धडक मारुन कारचे नुकसान केल्याने गुन्हा नोंद . :—

दिनांक १०/०४/२०१७ चे १७.१० वा. दरम्यान यातील फिर्यादी याने आपली हुंडाई आय १० कंपनीची कार क्र. एमएच ३६ एच ३०७५ ही सर्वीस रोड वर उभी करुन मित्राकडे गेले असता भंडारा कडुन साकोली कडे जाणाऱ्या यातील आरोपी ट्रक चालकाने आपल्या ताब्यातील वाहन हयगयीने व लापरवाहीने चालवुन सर्वीस रोडला लागुन बॅरीगेट तोडुन उभी असलेल्या कारला धडक मारुन कारचे २ ते ३ लाख रुपयाचे नुकसान केल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम २७९ भांदवि. सहकलम १८४/१७७ मोवाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. उईके पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहे.

**४) शासकीय पैश्याची अफरातफर करुन शासनाची फसवणुक केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०६/१०/२००९ ते २०११ पर्यत यातील नेरला उपसा सिंचन योजने अंतर्गत महाविद्युत पारेषन कंपनीचे १३२के. व्ही. उपकेन्द्र विद्युत भाराच्या पुरवठया साठी आरोपी क्र. १ ने के. पी. असोसिएशन सदोदय प्राईड दुसरा माळा छावणी नागपुर चे मालक या कंत्राटदाराला दिनांक ०६/१०/२००९ ला दिनांक १०/११/२००९ या दरम्यान १ कोटी ९९ लाखचे करारनामा क्र. ए–२/०१/डीएल/२०१२/२०१३ दिनांक २९/०१/२०१३ नुसार आरोपी क्र. २ ते ५ यांनी भुगतान केले. व नियमाप्रमाणे साहित्य कार्यक्षेत्रावर आणुन त्यांची पडताळणी विद्युत पारेषण कंपनी विभागीय कार्यालयाचे कर्मचारी यांनी केल्या शिवाय कोणत्याही रक्कमेचे भुगतान करता येत नाही. असे असुन सुध्दा उपरोक्त रक्कमेचे भुगतान करुन आरोपीतांनी शासनाची नुकसान करण्याचे हेतुने व शासनास फसवण्याचे उद्देशाने संगनमत करुन आरोपी क्र. १ यास बेकायदेशीर रित्या १ कोटी ९९ लाख रुपयांचे भुगतान केले व शासकीय पैश्याचा अपहार केला तसेच आरोपीतांनी विदयुत साहित्यांचा पुरवाठा केल्याचे पडताळणी केल्याचे खोटे दाखविले. व कुठेही साहित्य न आणता बिलावर रेडीफायड अश्या नोंदणी केल्या न आरोपीतांनी शासकीय पैश्याचा अपहार करुन शासनाची फासवणुक केल्यामुळे आरोपीतांनमुळे फिर्यादी अमोल भंगवतराव वैदय वय ३६ वर्ष, सहाय्यक अभियंता श्रेणी –१ पागोरा उपसा सिंचन उपविभाग क्र. १ आंबाडी (भंडारा) यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम ४०६,४०८,४०९,४६८,४७१,४२०,३४ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सपोनी. नेवारे पोलीस स्टेशन अडयाळ हे करीत आहे.

**५) अवैध दारु अडयांवर धाडी . :–**

दिनांक १०/०४/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो स्टे मोहाडी, कारधा, करडी, तुमसर, गोबरवाही साकोली, पालांदुर व अडयाळ येथे अवैध दारू अडयांवर धाडी घालुन एकुण १० गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन ७१ लिटर हातभट्टी दारु + १ मोटार सायकल किंमती ३०,९५०/–रु. माल व ०२ लिटर १६० मिली लिटर देशी दारु किंमती ६००/–रु. तसेच जुगारातुन किंमती १०४०/–रु. चा माल असा एकुण ३२,५९०/–रु. जप्त करण्यात आला आहे.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता